# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 09/04/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

### चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा शेतकी सावंगी शिवार येथे दिनांक 07/04/2021 चे 12.00 वा. ते दिनांक 08/04/2021 चे 02.30 वा. दरम्यान गाडी क्र. एमएच– 40/एन– 7259 वरील आरोपी नामे क्र. 1) शुभम मनोहर ठाकरे, वय 25 वर्ष, रा. नेरीमानकर ता. हिंगणा, 2) धीरज ज्ञानेश्वर माहुरकर, वय 24 वर्ष, रा गोंडखेरी 3) अभयकुमार सरगीगुलाबचंद गुप्ता, वय 20 वर्ष, रा. गोंडखेरी यांनी संगनमत करून दिलीप बील्डकॉम लिमीटेड कंपनीचे पुलाचे कामावरील 18 लोखंडी सेंट्रीगच्या प्लेट व 2 लोखंडी ब्रॅकेट असा एकुण किमंती 93,200/– रू. चा मुद्देमाल चोरून नेला. तपासा दरम्यान सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्याम नारायण काशी, वय 32 वर्ष, सोनुगंज ताथाना चुनारगंज जि. मिर्झापुर यु. पी. यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि खंडसे मो क्र 9421050370 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि. मी. गळपुरा चौक काटोल येथे दिनांक 06/03/2021 चे 19:30 वा. ते 20.00 वा. दरम्यान फिर्यादीचे पति/मृतक नामे– ईश्वर मंगलजी सुरजुसे, वय 30 वर्ष, रा. अर्जुन नगर, काटोल हे दळण व खर्रा आणण्याकरीता गेले असता त्यांना गळपुरा चौक काटोल येथे अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन ईश्वर सुरजुसे यांना धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागुन ते जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय काटोल व नंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान दिं. 07/04/2021 पहाटे 03.00 वा. दरम्यान मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ सिमा ईश्वर सुरजुसे, वय 30 वर्ष, रा. अर्जुन नगर काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा पंचफुला मोरे 9049607115 या करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 22 कि. मी. मौजा उंद्री शिवार येथे दिनांक 08/04/2021 चे 01:30 वा. दरम्यान आरोपी नामे– हरिष मधुकरराव सावरकर, रा. पिपळा फाटा याने त्याचे ताब्यातील एमएच– 49/एटी– 3627 क्रमांकाच्या टाटा एस गाडी मध्ये संग्राम सिमेंट प्रोजेक्ट पाचगाव येथुन 100 सिमेंट कंम्पाउंड पोल घेवुन सोबत तिन लोक न्यु भाग्यलक्ष्मी ले आउट डोंगरगाव येथे जात होते. त्यादरम्यान उंद्री शिवार समोर बाम्बे खदान च्या टर्निंग वर आरोपी याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन गाडी पलटी झाल्याने मागे असलेल्या सिमेंट पोलवर बसलेले आषीश जोगीराम भलावी, वय 21 वर्ष, रा. भाटीवाडा, जि. शिवनी (म.प्र) हा सिमेंट पोल पडल्याने जागेवर मरण पावला. तसेच गाडीमध्ये मागे बसलेला संतोष झाडुलाल परते, वय 26 वर्ष. रा. टीकरी ता. जि. शिवनी

(म.प्र) हा गंभीर जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दयाशंकर चमरू उईके, वय 23 वर्ष, रा. ग्राम केजई (कुही टोला) जी शिवनी ह. मु संग्राम सिमेंट प्रोजेक्ट पाचगाव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी अटक नाही. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मंडावले 9763234548 हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. कुही:– फिर्यादी नामे– करिश्मा उर्फ अश्विनी अमोल वंजारी, वय 21 वर्ष रा. तळोदी बाळापूर ता नागभीड जि चंद्रपूर ह मु. वार्ड नं 13 कुही जि नागपूर हिचे सोबत आरोपी नामे– 1) पति– अमोल अरविंद वंजारी याचे विवाह दि. 10/01/2021 ला झाले असुन यांचा एक महिना संसार सुरळीत सुरू होता. अंतर्गत 80 कि.मी. अंतरावर तळोदी येथे दिनांक 12/02/2021 चे सकाळी 11.30 वा. सुमारास आरोपी क्र. 1 याने फिर्यादीला एक लाख रूप्ये व हिरो होंडा गाडी ऑफीसमध्ये जाणे–येणे करिता वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपी नामे– 1) अमोल अरविंद वंजारी, 2) वंदना अरविंद वंजारी, 3) अरविंद पांडुरंग वंजारी, 4) तृष्णा अरविंद वंजारी वरील सर्व रा. तळोदी बाळापूर ता नागभीड जि चंद्रपूर यांनी संगनमत करून मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 294, 323, 504, 506, 34 भादंवी. सहकलम 3, 4 हुंडाबडी अधीनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि गुरुकर मो. न.9665834999 करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. काटोल :–अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील सोनोली पोस्ट ऑफीस येथे दिनांक 09/12/2018 ते दिनांक 24/04/2019 चे 00.00 वा ते 12.00 वा. पर्यंत फिर्यादी नामे– शिवम आंनदकुमार शंकर, वय 28 वर्ष, रा. ह. मु. ई. पी.एफ.ओ. क्वॉर्टर सक्करदरा नागपूर हे डाकविभाग येथे डाक निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. आरोपी नामे– सुशील ज्ञानेश्वर गायकवाड, रा. सोनोली ता काटोल याने सोनोली पोस्ट ऑफिसचे खातेधारकांकडून त्यांचे पोस्टाचे खात्यामध्ये जमा करणेकरीता रक्कम स्वीकारली होती. परंतु आरोपीने ती रक्कम खातेधारकांच्या खात्यामध्ये जमा न करता स्वःतासाठी वापरली. अशाप्रकारे आरोपीने सरकारी रक्कमेची अफरातफर करून खातेधाककांची 1,15,500/–रू. ची फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 420, 409 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी आश्विनी वानखेडे पोस्टे काटोल हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर